‘ आदिवासी नेते स्व. बाबुरावजी मडावी व्यक्ती आणि राजकीय कार्य:एक चिकित्सक अभ्यास.’

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापिठ, नांदेड.

मानव्य विद्याशाखेअंतर्गत राज्यशास्त्र विषयातील विद्यावाचस्पती (पीएच.डी.)पदवी करिता सादर करावयाच्या शोध प्रबंधाचा आराखडा.

- संशोधक -

गंगाधर उदयभान उईके

M.A.,D.T.Ed.,B.Ed.,SET (Pol.Science)

Email- gangadharuike236@gmail.com

Mobile- 9420073736 ; 8857085949

- मार्गदर्शक -

प्रा. डॉ. नवनाथ गोविंदराव अडकिणे

Email- ngadkine74@gmail.com

Mobile- 9421300542

राज्यशास्त्र विभागप्रमुख

कै. बाबासाहेब देशमुख गोरठेकर महाविद्यालय, उमरी ,ता.उमरी जि. नांदेड.

सप्टेंबर-2022

‘ आदिवासी नेते स्व.बाबुरावजी मडावी व्यक्ती आणि राजकीय कार्य:एक चिकित्सक अभ्यास.’

1) प्रस्तावना :-

मानव हा समाज प्रिय प्राणी आहे. प्रारंभीच्या भटकंतीयुक्त जीवनमानाकडून टप्प्याटप्प्याने कुटुंब,समाज व राज्य याप्रमाणे त्याचे जीवनमान विकसित झालेले आपल्याला दिसते. समूहाने आपले जीवन व्यतीत करताना समाज हा त्याच्या जीवनाचा अविभाज्य घटक बनला. तो आपल्या गरजा,अडचणी,सुख-दुख,भावना या भागवण्यासाठी समाजात राहू लागला. कालांतराने समाजात विभाजन घडुन येऊ लागले व समाज ही संकल्पना विविध अर्थाने वापरण्यात येऊ लागली. जेव्हा धार्मिक अर्थाने समाज या शब्दाचा विचार होऊ लागला,तेव्हा हिंदू समाज,मुस्लिम समाज, शिख समाज असे संबोधन व्हायचे. जातीवाचक अर्थाने समाज या शब्दाचा मराठा समाज, ब्राह्मण समाज, धनगर समाज असा उल्लेख करत आणि स्थानावरून समाज या शब्दाचा संदर्भ दिल्या जायचा. जसे, आदिवासी समाज, ग्रामीण समाज व नागरी समाज. आता समाज म्हटले की त्याची काही वैशिष्ट्ये असतात, जसे संस्कृती, विशिष्ट भौगोलिक प्रदेश, प्रजोत्पादन, आदर्श यासारख्या बाबीत प्रत्येक समाज इतर समाजापासून भिन्न असणार.

आदिवासी समाज :-

आदिवासी समाज राहण्याच्या वाडी-वस्तीचा आढावा घेतल्यास असे दिसून येते की, हा समाज प्रामुख्याने रानावनात, डोंगर-कपारीत व पर्वतीय भागात दिसून येतो. आदिवासी म्हणजेच आदीम किंवा आधीपासूनचे वास्तव्यास असणारे, ज्यांचे पूर्वज पूर्वीपासून येथे वास्तव्यास आहेत अशानाच आदिवासी म्हणुन ओळखल्या जाते. त्यांना त्यांच्या राहण्याच्या स्थानावरून गिरीजन, अरण्यक असे संबोधतात. ते मूळचे याच भूमीवरचे असल्याकारणाने त्यांचा उल्लेख भूमिजन म्हणून देखील केला

जातो. गिरीजन, अरण्यक किंवा भूमिजन ही तिन्ही संबोधने त्यांच्या राहण्याच्या स्थानावरून पडलेली दिसून येते. भारतीय संविधानात मात्र त्यांचा उल्लेख अनुसूचित जमाती, जनजाती म्हणून केलेला आहे. आदिवासी समाज इतर समाजांच्या सहवासापासून दूर राहिलेला, विकासाच्या प्रवाहापासून बाजूला राहिलेला समाज म्हणून ओळखल्या जातो. परंतु सामाजिकीकरणातून प्रत्येक समाजात परिवर्तन घडुन येतेच मग या परिवर्तनाला आदिवासी समाज अपवाद कसा असेल. समाजात एकोप्याने राहणे प्रत्येक व्यक्तीला गरजेचे वाटते, मग एकजीनसी समाजात एकोप्याने राहताना एकमेकांना सहकार्य करणे, इतरांची मदत घेणे व सामाजिक समस्या निरसन करण्यासाठी समाज ही संस्था प्रबळ झाली. यातूनच समाजात नेतृत्व किंवा नेता निर्माण होण्यास मदत मिळाली. नेता म्हणजे एखाद्या समुदायाला मान्य असणारा व्यक्ती, की त्या समुदायाने त्याला प्रतिनिधी म्हणून निवडलेला असतो व अधिकारही दिलेले असतात आणि त्या सर्व समुदायाला ते मान्य असतात. याच पार्श्वभूमीवर थोर राजकीय विचारवंत प्लेटोने तत्वज्ञ राज्यकर्ता किंवा नेता ही संकल्पना मांडलेली आहे. प्लेटो म्हणतो की, “राज्यकर्ते तत्वज्ञ असले पाहिजे किंवा तत्वज्ञानी व्यक्तीनीच राज्यकर्ते बनावे.’’ म्हणजे नेता हा समाजाच्या समस्या सोडवणारा, कुशल संघटक, सर्वांचा विचार करणारा, सहकार्य करणारा, समानतेने वागवणारा व आपले विचार प्रभावीपणे मांडणारा असणे गरजेचे असते.

भारतीय राज्यघटनेतील तरतुदीप्रमाणे भारत एक लोकशाही प्रधान राष्ट्र आहे. त्यामुळे भारतात लोकप्रतिनिधींना अनन्य साधारण महत्व प्राप्त झालेलं आहे. यामुळे भारतात निवडणुका, लोकप्रतिनिधी, लोकशाहीराज्य या बाबी स्वभाविकपणे घट्ट झालेल्या आहेत. त्यातच राज्यघटनेतील तरतुदीप्रमाणे समता, स्वातंत्र्य व न्याय यामुळे भारतीय लोकशाही आणखीनच भक्कम झाली आहे. समता, स्वातंत्र्य व न्याय या तत्त्वाचा उपयोग करून संपूर्ण समाज किंवा समूह म्हणा आपला विकास साधण्यासाठी राजकीय प्रवाहात समाविष्ट होण्याचा प्रयत्न करतात. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी सांगितलेला मूलमंत्र की, “जोपर्यंत समाजाने राजकारणात सक्रिय सहभागातून विकास साधणार नाही, तोपर्यंत समाजाचा कोणताच विकास होणार नाही.’’ भारतासारख्या लोकशाहीप्रदान राष्ट्रात सर्वांगीण विकास साधण्यासाठी राजकीय विकास व्हावा या

उद्देशाने सर्वत्र लोकशाहीचे विकेंद्रीकरण करण्यात आले. त्यातच महाराष्ट्रातील पंचायतराजमुळे लोकशाहीचे अगदी तळागाळापर्यंत सत्तेचे विकेंद्रीकरण होण्यास यश मिळाले. याच्या माध्यमातून विविध आयोग, राजकीय संस्था, मंत्रिमंडळ विभाग यांच्या स्थापनेमुळे प्रत्येक समाज व त्या समाजातील प्रतिनिधी मोठ्या प्रमाणात सहभागी होऊ लागले. त्या बाबीला आदिवासी समाजही अपवाद नाही. प्रत्येक समाजाचा नेता आपल्या समाजाला पुढे नेण्यासाठी, विकास करण्यासाठी पुढे सरसावत होता. त्यातच आदिवासी समाजातील नेत्यांनी देखील त्या सत्ता विकेंद्रीकरणाच्या व त्यातून समाजाला विकासाच्या प्रवाहात आणण्यासाठी सहभागी झाले. त्यातून समाजाचा विकास करणे, समाजाच्या समस्या सोडवणे, समाजाला पुढे नेणे या उद्देशाने राजकारणात प्रवेश केला. आदिवासी नेत्यांच्या या यादीत बरेच नावे सांगता येतील. जसे की, वसंतरावजी पुरके, विष्णूजी सावरा, राजेंद्र गावित, मधुकरराव पिचड, नारायणसिंह उईके, विठ्ठलराव गेडाम, सिताराम भोये, दामोदर शिंगडा, कृष्णा घोडा व बाबुरावजी मडावी इत्यादी. या सर्व आदिवासी नेत्यांना इतक्या सहजासहजी समाजासाठी नेतृत्व करता आले असे अजिबात नाही. कारण तत्कालीन परिस्थिती, सामाजिक- आर्थिक मागासलेपण, सामाजिक पिळवणूक, शैक्षणिक मागासलेपणा त्यातच आदिवासी समाजातील नासमजपणा, अशिक्षितपणा, व्यसनाधीनता, दारिद्र्य, उपासमार या अशा अनेक समस्यांनी ग्रासलेल्या समाजातून अतिशय प्रतिकूल परिस्थितीला सामोरे जाऊन उद्याच्या समाजाला एक नेतृत्व दिल.

प्रस्तुत संशोधनासाठी **'बाबुरावजी मडावी व्यक्ती व त्यांचे राजकीय कार्य: एक चिकित्सक अभ्यास'** हा विषय संशोधन करण्यासाठी निवडला आहे. दारिद्र्य हे पाचवीला पुजलेलं असतानाही अशा बिकट परिस्थितीतून वाट काढत, दोन वेळा आमदार व सार्वजनिक बांधकाम व समाजकल्याण मंत्री असे महत्त्वाचे पद भूषवून आपली प्रतिमा उमटवली आणि आपल्या राजकीय कामातून समाजकारण मोठ्या जोमाने केले. चंद्रपूर पासून आदिवासींच्या विकासासाठी गडचिरोली जिल्हा

निर्मितीचे काम, जात पडताळणी कार्यालयाचे काम, जमीन हस्तांतरण कायदा, क्षेत्रबंदी कायदा, बोगस आदिवासी विरुद्‌धचा लढा यासारखी अनेक कामे व आदिवासींच्या अस्तित्वाचे प्रश्न सोडवण्याच्या कार्यात त्यांचे भरीव योगदान आहे.

2) संशोधन विषय निवडीचे हेतू :-

एखाद्‌या समाजाचा अभ्यास करताना त्या समाजाच्या परिस्थितीला मुख्य जबाबदार घटक असतो, तो म्हणजे त्या समाजातील नेता किंवा नेतृत्व होय. एखादा नेता समाजाला आपलं कुटुंब समजून आयुष्यभर निस्वार्थीपणे समाज हितासाठी अहोरात्र कार्य करतो. पण वस्तुस्थिती अशी आहे की आपण त्या घटकाकडे कमीत कमी लक्ष केंद्रित करतो व इतर बाबींचा अभ्यास करून त्या समाजाच्या परिस्थितीवर टिप्पणी करायला लागतो. पण या संशोधनात समाजाच्या त्या मुख्य घटकाला प्रकाशात आणण्याच्या हेतूने प्रस्तुत शोध प्रबंधासाठी '**आदिवासी नेते स्व.बाबुरावजी मडावी व्यक्ती आणि राजकीय कार्य: एक चिकित्सक अभ्यास**' या शीर्षकाची निवड केलेली आहे. या शोध प्रबंधात बाबुरावजी मडावी यांच्या जीवन व राजकीय कार्याविषयी अभ्यास करण्याचा यातून प्रयत्न केला जाणार आहे.

3) संशोधन समस्या :-

आदिवासी नेते म्हणून, बाबुरावजी मडावी यांच्या व्यक्तिमत्त्वावर संशोधन करायचे आहे. ते सध्या हयात नाहीत व त्यांच्या विषयी लिखित दस्तऐवज मर्यादित स्वरूपाचे आहे. शिवाय शासकीय दस्तऐवज मधून तथ्य संकलनासाठी काही मर्यादा येऊ शकतात. अशा सर्व मर्यादा असल्या तरी यांचा कमीत कमी परिणाम कसा होईल व संशोधन कार्य कसे वेळेत पूर्ण होईल यावर भर दिला जाणार आहे.

4) संशोधनाची उद्‌दिष्टे :-

प्रस्तुत संशोधनासाठी खालील प्रमाणे उद्‌दिष्टे निश्चित केलेली आहेत.

1) बाबुरावजी मडावी यांच्या जीवनावर कौटुंबिक, सामाजिक, राजकीय परिस्थितीचा झालेला प्रभाव अभ्यासणे.
2) बाबुरावजी मडावी यांचे व्यक्तिमत्व जाणून घेणे.
3) बाबुरावजी मडावी यांचे आदिवासी समाजाविषयीचे प्रेम व त्यांचे सेवावृत्ती विचार अभ्यासणे.
4) बाबुरावजी मडावी यांच्या सामाजिक कार्याचा अभ्यास करणे.
5) बाबुरावजी मडावी यांच्या राजकीय कामगिरीचे अध्ययन करणे.
6) बाबुरावजी मडावी यांची सार्वजनिक बांधकाम व समाजकल्याण मंत्री या दृष्टिकोनातून त्यांचा कार्यकाल अभ्यासणे.

5) संशोधनाची गृहीतके :-

संशोधन कार्य योग्य पद्धतीने व चाकोरीबद्ध होण्यासाठी संशोधनाची पुढील गृहीतके निश्चित केलेली आहेत.

1) बाबुरावजी मडावी यांच्या नेतृत्व विकासात त्यांचे व्यक्तिगत गुण कारणीभूत आहेत.
2) बाबुरावजी मडावी यांचे समाजासाठीचे बोगस आदिवासी विरोधी आंदोलन, गडचिरोली जिल्हा निर्मिती, जमीन हस्तांतरण कायदा, क्षेत्रबंदी कायदा या विविध कार्यासाठीचे उपोषण-आंदोलन यामुळे आदिवासी समाजाने त्यांना एकमताने नेता म्हणून स्वीकारले.
3) बाबुरावजी मडावी यांच्या निस्वार्थी समाजकार्याच्या बळावर व आदिवासी समाजाचे तत्कालीन प्रखर नेतृत्व म्हणून काँग्रेस पक्षाने त्यांना सार्वजनिक बांधकाम आणि समाजकल्याण मंत्री सारखे जबाबदारीचे पद दिले.

4) बाबुरावजी मडावी यांचे आदिवासी समाजा प्रतीची आपुलकी, समाजाच्या विकासासाठीची धडपड, समाजनिष्ठा यामुळे त्यांना सेवावृत्ती, जननायक, लोकनेते म्हणून आदिवासी समाजाने डोक्यावर घेतले.

5) बाबुरावजी मडावी यांना राजकारणात एक आदिवासी नेता म्हणून, समाजाची बाजू मांडताना, समाजातील समस्या मांडताना बऱ्याच अडचणींना समोर जावे लागले.

6) संशोधनाचा आराखडा व संशोधन पद्धती :-

प्रस्तुत संशोधनासाठी व्यष्टी अध्ययन आराखडा याचा आधार घेतला जाणार आहे. बाबुरावजी मडावी यांचा व्यक्ती म्हणून व त्यांच्या राजकीय कार्याचा या संशोधनात अभ्यास केला जाणार आहे. संशोधनात ऐतिहासिक व सर्वेक्षनात्मक पद्धतीचा उपयोग केल्या जाणार आहे. तथ्य संकलन करण्यासाठी मुलाखत तंत्र वापरून संशोधन पूर्ण केले जाणार आहे. संशोधनासाठी वर्णनात्मक व विश्लेषणात्मक पद्धतीचा उपयोग केला जाणार आहे.

7) संशोधनाची व्याप्ती :-

प्रस्तुत संशोधनात बाबुरावजी मडावी यांचा व्यक्ती म्हणून व त्यांच्या राजकीय कार्याचा एक आदिवासी नेता म्हणून अभ्यास केला जाणार आहे. तसेच एका सर्वांगीण मागासलेल्या, दारिद्र्याने जखडलेल्या, कागदावरचा विकास प्रत्यक्षात अनुभवण्याच्या प्रतीक्षेत असलेल्या, आदिवासी समाजाचा खऱ्या अर्थाने विकास साधण्यासाठीच्या प्रामाणिक आदिवासी नेत्याचे गुण वैशिष्ट्य आणि आदिवासी नेत्यासमोरील येणाऱ्या अडचणींचा अभ्यास केला जाणार आहे.

8) संशोधनाची मर्यादा :-

प्रस्तुत संशोधनात बाबुरावजी मडावी यांच्या व्यक्तिमत्त्वाचा आणि त्यांच्या राजकीय कार्याचा अभ्यास केला जाणार आहे. तथ्य संकलनासाठी उपयोगात आणले जाणारे मुलाखत तंत्र यातही काही अंगभूत मर्यादा आहेत. शिवाय बाबुरावजी मडावी यांच्या आप्तसंबंधी, नातेवाईक, मित्रपरिवार यांच्याशी संवाद साधताना भाषिक मर्यादा येऊ शकते. पण या सर्वच मर्यादाचा क्वचितच परिणाम होईल याची खबरदारी घेऊन संशोधन कार्य पूर्ण केले जाणार आहे.

9) पूर्व संशोधन साहित्याचा आढावा :-

बाबुरावजी मडावी यांच्यावर याआधी संशोधन झालेलं नसल्याकारणाने प्रस्तुत संशोधनात मासिके, नियतकालिके, वर्तमानपत्रे व विधानसभा नोंदी अहवाल त्याचप्रमाणे निवडणूक आयोगाचे वेबसाईट या सर्वांच्या आधारे संशोधनाचे कार्य पूर्ण केले जाईल.

10) संशोधन साधने :-

संशोधन म्हटले की; ते पूर्ण होण्यास संशोधन साधनाची आवश्यकता असतेच. गुणात्मक किंवा संख्यात्मक स्वरूपाच्या संशोधनात तथ्य संकलनाचे कार्य महत्त्वाचे असते. यासाठी प्राथमिक स्त्रोत व दुय्यम स्त्रोत या दोन्ही मार्गाचा अवलंब करावा लागतो. मुलाखत, प्रश्नावली व निरीक्षण या प्राथमिक स्त्रोताच्या माध्यमातून तथ्य संकलन केल्या जाईल. तसेच व्यक्तिगत नोंदी, सरकारी अहवाल, सेवेतील नोंदी या दुय्यम स्त्रोतांचा देखील वापर केला जाईल. प्रस्तुत संशोधन हे व्यष्टी अध्ययन प्रकारचे असल्याकारणाने इथे दोन्ही स्त्रोतांचा उपयोग करावा लागणार आहे. बाबुरावजी मडावी यांच्या व्यक्तिगत जीवनाविषयी तथ्याचे संकलन हे मुलाखत तंत्राचा उपयोग करून व त्यांच्या राजकीय कार्याचा अभ्यास हा दुय्यम स्त्रोताच्या माध्यमातून केला जाईल.

11) अपेक्षित प्रकरणे :-

'आदिवासी नेते स्व. बाबुरावजी मडावी व्यक्ती आणि राजकीय कार्य: एक चिकित्सक अभ्यास' या शोध प्रबंधासाठी खालील प्रमाणे प्रकरणाची मांडणी केली जाणार आहे.

प्रकरण 1 :- प्रस्तावना

प्रस्तुत प्रकरणांमध्ये विषय निवडी मागची भूमिका, विषयाचे महत्त्व, उद्दिष्टे, गृहीतके, तथ्य संकलन, मर्यादा, अहवालांचा आराखडा इत्यादी घटकाचे विवेचन केले जाणार आहे.

प्रकरण 2 :- आदिवासी समाज: ऐतिहासिक पार्श्वभूमी व स्वरूप

प्रस्तुत प्रकरणामध्ये आदिवासी ही संकल्पना, आदिवासी समाजाची ऐतिहासिक पार्श्वभूमी, आदिवासी समाजातील जाती-उपजाती, तसेच त्यांची धार्मिक, सांस्कृतिक, सामाजिक, शैक्षणिक, आर्थिक व राजकीय परिस्थिती किंवा सद्यस्थिती, शासकीय योजना आणि आदिवासी समाजातील होत चाललेल्या सुधारणा इत्यादी घटका विषयी चर्चा करण्यात येईल.

प्रकरण 3 :- कौटुंबिक पार्श्वभूमी व व्यक्तिमत्त्वाची जडणघडण

प्रस्तुत प्रकरणात बाबुरावजी मडावी यांचे बालपण, कौटुंबिक संस्कार, शिक्षण, सामाजिक कार्यातील सहभाग, तसेच त्यांच्या व्यक्तिमत्व विकासाच्या जडणघडणीत कारणीभूत ठरलेल्या अनेकविध पैलूंचा आढावा घेत राजकारणातील प्रवेश इत्यादी बाबींची यात चर्चा करण्यात येणार आहे.

प्रकरण 4 :- आरमोरी विधानसभा मतदारसंघाचा अभ्यास

या प्रकरणात आरमोरी जि.गडचिरोली या आदिवासी राखीव मतदार संघाचा महाराष्ट्राच्या स्थापनेपासूनचा अभ्यास केला जाणार आहे.

प्रकरण 5 :- बाबुरावजी मडावी यांचे आदिवासी नेते म्हणून सामाजिक कार्य

प्रस्तुत प्रकरणात बाबुरावजी मडावी यांचे आदिवासी समाजा प्रतीचे प्रेम, निष्ठा व त्यांच्या सेवावृत्ती विचारातून केलेल्या समाजकार्याची आणि एक आदिवासी नेते या नात्याने केलेल्या कार्याचे विवेचन यात केले जाणार आहे.

प्रकरण 6 :- बाबुरावजी मडावी यांचे राजकीय कार्य

या प्रकरणात बाबुरावजी मडावी यांचे आरमोरी मतदार संघातील राजकीय कार्य, आमदार पदापासून ते सार्वजनिक बांधकाम आणि समाजकल्याण मंत्री पदापर्यंतची पार पाडलेली जबाबदारी, आदिवासी नेते म्हणून विधानसभेत आदिवासी समाजाची मांडलेली बाजू, गडचिरोली जिल्हा निर्मिती, जमीन हस्तांतरण कायदा या राजकीय कार्याचे विवेचन यात केले जाणार आहे.

प्रकरण 7 :- सारांश व निष्कर्ष

या प्रकरणात वरील सर्वच प्रकरणांचा आढावा घेऊन संशोधनांचे निष्कर्ष मांडले जाणार आहेत.

12) संदर्भग्रंथ सूची :-

12.1) ग्रंथ संदर्भ

1) डॉ. इंद्रजीत जाधव, आदिवासी विकास आणि योजना; सनई प्रकाशन, पुणे- 2019

2) दीपक गायकवाड, आदिवासी चळवळ स्वरूप व दिशा ;सुगावा प्रकाशन, पुणे-

3) डॉ. गोविंद गारे, महाराष्ट्रातील आदिवासी जमाती; अक्षरधारा प्रकाशन, पुणे- 2019

4) डॉ. गोविंद गारे, नक्षलवादी आणि आदिवासी; अक्षरधारा प्रकाशन पुणे- 2017

5) एस.एल.दोशी आणि पी.सी.जैन, जनजातीय समाजशास्त्र; रावत प्रकाशन, नागपूर-2022

6) डॉ. मोतीराज राठोड, गुन्हेगार जमाती कायदा आणि परिणाम; निर्माण प्रकाशन, पुणे -2012

7) डॉ. सुनील कुमरे, तीर कामठा; हरिवंश प्रकाशन, चंद्रपूर-

8) डॉ. विनायक तुमराम, रान गर्भातील जखमा; हरिवंश प्रकाशन, चंद्रपूर- 2018

9) डॉ. हरीशचंद्र बोरकर, झाडीपट्टीची दंडार; दास्ताने प्रकाशन, पुणे-

10) डॉ. लक्ष्मीकांत जिरेवाड, मनेरवारलू जमात; समृद्ध प्रकाशन, बीड – 2010

11) डॉ. विजय मानकर, आदिवासी मूलनिवासीयों के मुक्तियों का दस्ताऐवज;गिरणा ग्राफिक प्रकाशन, नागपूर -2013

12.2) नियतकालिके :-1) लोकराज्य 2) योजना 3) परिवर्तनाचा वाटसरू 4) आंदोलन

12.3) दैनिके :- 1) दैनिक लोकमत 2) दैनिक सकाळ 3) दैनिक लोकसत्ता 4) दैनिक पुण्यनगरी 5) दैनिक महाराष्ट्र टाइम्स

12.4) संकेत स्थळे :-

1) www.eci.gov.in

2) www.tribal.maharashtra.gov.in

3) www.inc.in

4) www.myneta.info

संशोधक

गंगाधर उदयभान उईके

M.A.,D.T.Ed.,B.Ed.,SET.(Pol.Science)

मार्गदर्शक

प्रा. डॉ. नवनाथ गोविंदराव अडकिणे

राज्यशास्त्र विभागप्रमुख

कै.बाबासाहेब देशमुख महाविद्यालय, उमरी, ता.उमरी जि. नांदेड.